# पंचकोनी घडी



घडी घालून पंचकोन बनवता येईल का? हे थोडेसे गुंतागुंतीचे असले तरी तसे सोपेच आहे. 1893 मध्ये टी. सुंदर राव यांनी हे सुंदर रीतीने दाखवले होते. कसे?
ए/4 आकाराच्या कागदाची एक 3 सेंटीमीटर रुंदीची पट्टी कापून घ्या आणि त्याची साधी गाठ मारा. ही गाठ सपाट करा आणि बाजूला राहिलेली टोके कापून टाका म्हणजे तुम्हाला एक पंचकोन मिळेल. आपण कितीदा गाठ मारली आहे, पण हे आपल्या कधी लक्षातच आले नाही!

